## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्र.संगाबाअवि /1 / 109 /2-342 / 2020 दिनांक - 23.3.2020

प्रति,

1) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
2) मानद संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा
3) प्राचार्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये

विषय - कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मा. जिल्हादंडाधिकारी,अमरावती यांचे आदेश क्र.कक्ष /27/ कलि /गृहविभाग/144/ कावि-243/ 2020 दि.22.3.2020

विषयांकित मा. जिल्हादंडाधिकारी, अमरावती यांचे आदेश यासोबत जोडले आहेत. सर्व संबंधितांनी सदर आदेशाची नोंद घेऊन काटेकोरपणे पालन करण्यात यावे, ही विनंती

- आदेशान्वये

डॉ.तुषार देशमुख
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प अमरावती ४४४ ६०२
(गृह विभाग)
☎: ०७२१-२६६२०२५/२६६२४९३ फॅक्स : ०७२१-२६६२८४३
Email:- homebranch.collamt@gmail.com Website :- www.amravati.nic.in

क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/१४४ आदेश/कावि-२४३/२०२० दिनांक :- २२/०३/२०२०

## आदेश

ज्या अर्थी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशात तसेच राज्यामध्ये प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना एक भाग म्हणुन नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी अमरावती जिल्हयातील गर्दीच्या ठिकाणी विषाणू एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्ती पर्यंत पसरु नये तसेच अमरावती शहर व ग्रामीण जिल्हयात अशा वेळी लोकांमध्ये वेगवेगळे तर्क वितर्क निर्माण होऊन सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था भंग होणार नाही याकरीता नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

त्या अर्थी अमरावती जिल्हयामधील शहरी भागांमध्ये सर्व शाळा/कॉलेज, सिनेमागृहे, आठवडी बाजार, जनावरांचे बाजार, उत्सव, जत्रा, इ. बंद ठेवण्याकरीता व प्रतिबंध घालण्यासाठी तसेच सर्व संबंधितांना नोटीसेस देऊन त्यांचे म्हणने ऐकून घेणे सद्य परिस्थितीत शक्य नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये आदेश पारीत करणे इतपत माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी मी शैलेश नवाल, जिल्हादंडाधिकारी अमरावती फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अमरावती जिल्हयामधील शहरी भागांमध्ये या आदेशानुसार **खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश पारीत करीत आहे.**

१. हया आदेशानुसार पाच किंवा त्यापेक्षा जास्त लोकांनी, जमावाने एकत्रीत जमू नये
२. कोरोना व्हायरस च्या अनुषंगाने कोणत्याही नागरिकाने समाजामध्ये अफवा, अपप्रचार, व भिती निर्माण होईल अशा प्रतिक्रिया व्हॉटसअॅप, फेसबुक, व्टिटर, वृत्तपत्र सोशल मिडीया व होर्डींगस इत्यादीवर प्रसारित करु नये तसेच अधिकृत माध्यमाव्दारे माहिती न घेता दिशाभुल करणारी माहिती प्रसार माध्यमांवर प्रसारित करु नये.
३. कोरोना व्हायरस चा अपप्रचार होईल या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे व्हिडीओ, फोटो प्रसारित करुन अफवा पसरवू नये तसेच कोणत्याही विशेष प्रकारे महाआरती, समुहपठण, धर्मपरिषदांचे आयोजन करु नये.
४. मिरवणूका, रॅली, सामुहिक कार्यक्रम, भाषणबाजी यांना या आदेशाव्दारे प्रतिबंध घालण्यात येत आहे.
५. यामध्ये सर्व प्रकारची धार्मिक स्थळे, प्रार्थनास्थळे यांना सुध्दा सदरचा आदेश लागू राहील.सदर प्रार्थना स्थळांवर प्रार्थना, पुजाअर्चा ५ पेक्षा कमी व्यक्तींव्दारा सुरु राहील पण अशी धार्मिक स्थळे भाविंकासाठी बंद राहतील.
६. अमरावती जिल्हयातील सर्व प्रकारच्या ट्रॅव्हल्स, खाजगी बसेस, एस. टी. बसेस बंद राहतील.
७. जिवनावश्यक व अत्यावश्यक कारणांसाठीच शहराअंतर्गत बस सेवा सुरु राहतील. जिवनावश्यक वस्तुंची वाहतुक करणारे ट्रक, व वाहने यांची सेवा वगळण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

८. सदरचा आदेश हा संपूर्ण अमरावती जिल्हयाच्या शहरी भागांमध्ये लागू राहील.
९. शासकीय, निमशासकीय कार्यालयामध्ये आवश्यक त्या कामांकरीता केवळ ५ टक्के कर्मचारी उपस्थित राहतील.
१०. ज्या नागरिकांचे विलगीकरण केले आहे व ज्यांच्या हातावर शिक्के आहेत त्यांनी पुढील १५ दिवस घराबाहेर पडु नये व घरात सुध्दा वेगळे राहावे.
११. सर्व नागरिकांना अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी विहित कारणांशिवाय येण्यास मनाई राहील.
१२. नागरिकांना आवश्यक असणाऱ्या जिवनावश्यक वस्तुंचा साठा अथवा काळा बाजार करण्यात येऊ नये, तसेच सदर जिवनावश्यक वस्तु हया वाढीव दराने सुध्दा विकण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

सबब कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन अमरावती जिल्हयातील सर्व प्रकारचे सोने-चांदीची दुकाने, कापड, ऑटो मोबाईल, भांडयाची दुकाने, इलेक्ट्रीक-इलेक्ट्रॉनीक्स, टिंबर, प्लायवुड, मोबाईल दुकाने, सलुन, ब्युटी पार्लर, गॅरेज, हॉटेल्स, रेस्टॉरेंट, स्वीट मार्ट, लॉज, ढाबे, चहा-नाश्ता प्रतिष्ठाने, पानटपरी, जलतरण उद्यान, बगीचे, मॉल्स, कोचिंग क्लासेस, खाजगी शिकवणी वर्ग, व्यायामशाळा व इतर सर्व प्रतिष्ठाने ही बंद ठेवण्यात यावी. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे या आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता- १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. अशा प्रकारची कारवाई ही संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी यांनी तात्काळ त्यांचे स्तरावरुन करावी.

यामध्ये जिवनावश्यक वस्तु कायदयाअंतर्गत असणारी किराणा, धान्य दुकाने, औषधी केंद्र व औषधालये, दुध, भाजीपाला, वैद्यकीय उपकरणे सेवा, पेट्रोलिअम पदार्थ, हे सर्व पदार्थ व त्यांची वाहतूक, बँक व वित्तीय सेवा, रुग्णालये (दवाखाने), अंत्यविधी क्रिया, पाणी पुरवठा, विज, स्वच्छता विषयक सेवा, टेलीफोन, इंटरनेट सेवा, डाक सेवा, प्रसारमाध्यमे व इतर अत्यावश्यक असलेल्या सेवा सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.

सदरचे आदेश हे आज दिनांक २२/०३/२०२० चे २१.०० वा. पासून ते ३१/०३/२०२० चे २४.०० वा. पर्यंत लागू राहतील. सदरहू आदेश आज दिनांक २२/०३/२०२० रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला.

DISTRICT MAGISTRATE AMRAVATI.

22/3

(शैलेश नवाल)
जिल्हादंडाधिकारी अमरावती
District Magistrate
AMRAVATI.

प्रतिलिपी:-

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. पोलीस आयुक्त (शहर) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
**/- पोलीस विभागाने याबाबत ध्वनीक्षेपकावरुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी व या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.**
३. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
***/- पोलीस विभागाने याबाबत ध्वनीक्षेपकावरुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी व या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.***

Scanned by CamScanner

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
६. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
८. उपविभागीय दंडाधिकारी ............................(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
९. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अमरावती ............................(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
१०. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत ............................(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
११. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती यांना माहिती व उचित प्रसिध्दीकरीता रवाना.

**/- सदर आदेशास अमरावती जिल्ह्यातील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**

१२. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१३. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१४. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
१५. व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय,नागपूर यांना माहिती करीता तथा शासकिय राजपत्रात वरील आदेशाची प्रसिध्द करुन ५ प्रती या कार्यालयास सादर करण्यात याव्या.
१६. संबंधित सर्व विभाग ............................यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

DISTRICT MAGISTRATE
AMRAVATI

22/7

जिल्हादंडाधिकारी, अमरावती
District Magistrate
AMRAVATI

!! बेटी बचाओ, बेटी पढाओ !!

Scanned by CamScanner